विधि व न्याय विभागाच्या अधिपत्याखालील १३सरकारी वकील कार्यालयातील गट-ब (राजपत्रित), गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांवर सरळसेवा, पदोन्नती वा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात <u>नियुक्ती प्राधिकारी घोषित करणेबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२८२६/प्र.क्र. ६५/का.८**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दि. १५ जून, २०२६**

**वाचा:-** १) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. इएसटी-२०११/२१७५/ प्र.क्र.४५८/कार्या-२, दि.१४.०३.२०११.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/ प्र.क्र.२९०/कार्या-१२,दि. १९.११.२०१६.
३) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२८२१/प्र.क्र.२१/का.८, दि.०८.०७.२०२१
४) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२८२४/प्र.क्र.७२/का.८, दि.२७.११.२०२४

**प्रस्तावना:-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील दि.१९.११.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये गट-ब (अराजपत्रित), गट-क, आणि गट-ड मधील अधिकारी व कर्मचा-यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणूका/पदस्थापनेसंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याबाबत संबंधित विभागाचे सचिव/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यापैकी नियुक्ती प्रधिकारी कोण राहतील हे ठरविण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्र आदेश काढावेत , असे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने, विधि व न्याय विभागाच्या अधिनस्त १३ सरकारी वकील कार्यालयातील गट-ब (राजपत्रित), गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड च्या पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात संदर्भ क्र.३ येथील दि.०८.०७.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्यात आलेले आहेत.

२. संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णय, दि.२७.११.२०२४ अन्वये या कार्यासनाच्या अधिनस्त १३ सरकारी वकील कार्यालयांच्या आस्थापनेवरील एकूण ८२१ पदांच्या (६३३ नियमित व १८८ बाह्ययंत्रणेद्वारे) सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. सुधारित आकृतीबंधानुसार काही

सरकारी वकील कार्यालयांच्या आस्थापनेवर नवीन पदांची निर्मिती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१९.११.२०१६ च्या शासन निर्णयामधील सूचनेनुसार सदर पदांवरील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणुका/पदस्थापना करण्याकरिता नियुक्ती प्राधिकारी घोषित करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णय, दि.०८.०७.२०२१ अधिक्रमित करुन १३ सरकारी वकील कार्यालयातील सर्व पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णयः-</u>**

विधि व न्याय विभागाच्या अधिपत्याखालील, १३ सरकारी वकील कार्यालयातील गट-ब (राजपत्रित), गट-ब (अराजपत्रित), गट-क, आणि गट-ड संवर्गातील पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणुका/ पदस्थापना करण्यासाठी या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्यात येत आहेत.

२. परिशिष्ट-अ येथील नियुक्ती प्रधिकारी हे सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी असतील. मात्र बदली करण्यासंदर्भात बदली अधिनियमान्वये घोषित केलेले सक्षम प्राधिकारी अंतिम निर्णय घेतील .

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२९०/कार्या.१२, दि.१९.११.२०१६ मधील परिच्छेद क्र.२ अन्वये विभाग प्रमुखांना देण्यात आलेल्या निर्देशानुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०६१५१२२६४२६४१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षारीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SANJAY DAGADU KHEDEKAR

Digitally signed by SANJAY DAGADU KHEDEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=LAW AND JUDICIARY DEPARTMENT,
2.5.4.20=ef1e8a09ec30ef541f15588eb76b17fefaaf4e8c2d06b9d8d9aed2bc1cdf353b, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F754D4BA6FE8F00C0E15635F0F58C9242CEAD19994FE32A6EBE261A0E4B1874C, cn=SANJAY DAGADU KHEDEKAR
Date: 2026.06.15 12:27:37 +05'30'

**( सं. द. खेडेकर )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.

२) मा. राज्यमंत्री (विधि व न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४) सहयोगी महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५) सह सचिव, विधि व न्याय विभाग, शाखा नागपूर.

६) सह सचिव, विधि व न्याय विभाग, शाखा छत्रपती संभाजीनगर.

७) सरकारी वकील, सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई.

८) सरकारी वकील, सरकारी वकीलांचे कार्यालय , उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई.

९) सरकारी वकील, सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपील शाखा (रिट सेल), मुंबई.

१०) सरकारी अभियोक्ता, सरकारी अभियोक्ता बृहन्मुंबई यांचे कार्यालय, मुंबई.

११) सरकारी वकील, नगर दिवाणी न्यायालय, मुंबई.

१२) सरकारी वकील, सरकारी वकीलांचे कार्यालय , उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर.

१३) सरकारी वकील, सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद.

१४) मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.

१५) मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर.

१६) मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर.

१७) सरकारी वकील, सरकारी वकीलांचे कार्यालय, सर्वोच्च न्यायालय, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.

१८) सामान्य प्रशासन विभाग (का.१२), मंत्रालय, मुंबई.

१९) निवडनस्ती/का.८.

**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२८२६/प्र.क्र.६५/कार्या-८, दि. १५ जून, २०२६ सोबतचे सहपत्र**

**परिशिष्ट-अ**

| १. महाअधिवक्ता यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य , मुंबई | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदे/संवर्ग** | **गट** | **नियुक्ती प्रधिकारी** |
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | स्वीय सहायक | गट-ब (राजपत्रित) | |
| ३ | अधीक्षक | गट-ब (अराजपत्रित) | मा. महाअधिवक्ता, महाअधिवक्ता कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (तथा कार्यालय प्रमुख ) |
| ४ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | कनिष्ठ अनुवादक व दुभाषी | गट-क | |
| ६ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ७ | लिपिक-टंकलेखक | गट-क | |
| ८ | वाहनचालक (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-क | |
| ९ | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |
| **२. सहयोगी महाअधिवक्ता यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** | | | |
| **अ.क्र.** | **पदे/संवर्ग** | **गट** | **नियुक्ती प्रधिकारी** |
| १ | स्वीय सहायक | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | अधीक्षक | गट-ब (अराजपत्रित) | सहयोगी महाअधिवक्ता, सहयोगी महाअधिवक्ता यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (तथा कार्यालय प्रमुख ) |
| ४ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ५ | लिपिक-टंकलेखक | गट-क | |
| ६ | वाहन चालक(बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-क | |
| ७ | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |
| **३. सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय , अपील शाखा, मुंबई.** | | | |
| **अ.क्र.** | **पदे/संवर्ग** | **गट** | **नियुक्ती प्रधिकारी** |
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | स्वीय सहायक | गट-ब (राजपत्रित) | |
| ३ | अधीक्षक | गट-ब (अराजपत्रित) | सरकारी वकील, सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई. (तथा कार्यालय प्रमुख ) |
| ४ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ६ | ग्रंथपाल | गट-क | |
| ७ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ८ | लघुटंकलेखक | गट-क | |
| ९ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |
| १० | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |

४. सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई.

| अ.क्र. | पदे/संवर्ग | गट | नियुक्ती प्रधिकारी |
|---|---|---|---|
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | स्वीय सहायक | गट-ब (राजपत्रित) | |
| ३ | अधीक्षक/लेखापाल | गट-ब (अराजपत्रित) | सरकारी वकील, सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई. (तथा कार्यालय प्रमुख ) |
| ४ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ६ | ग्रंथपाल | गट-क | |
| ७ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ८ | लघुटंकलेखक | गट-क | |
| ९ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |
| १० | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |

५. सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपील शाखा (रिट सेल), मुंबई.

| अ.क्र. | पदे/संवर्ग | गट | नियुक्ती प्रधिकारी |
|---|---|---|---|
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | स्वीय सहायक | गट-ब (राजपत्रित) | |
| ३ | अधीक्षक/लेखापाल | गट-ब (अराजपत्रित) | सरकारी वकील, सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपील शाखा (रिट सेल), मुंबई. (तथा कार्यालय प्रमुख ) |
| ४ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ६ | ग्रंथपाल | गट-क | |
| ७ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ८ | लघुटंकलेखक | गट-क | |
| ९ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |
| १० | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |

६. सरकारी वकील, नगर दिवाणी न्यायालय, मुंबई

| अ.क्र. | पदे/संवर्ग | गट | नियुक्ती प्रधिकारी |
|---|---|---|---|
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | अधीक्षक | गट-ब (अराजपत्रित) | सरकारी वकील, नगर दिवाणी न्यायालय, मुंबई. (तथा कार्यालय प्रमुख ) |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ४ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | सहायक अधीक्षक | गट-क | |
| ६ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ७ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |
| **७. सरकारी अभियोक्ता, सरकारी अभियोक्ता बृहन्मुंबई यांचे कार्यालय, मुंबई** | | | |
| **अ.क्र.** | **पदे/संवर्ग** | **गट** | **नियुक्ती प्रधिकारी** |
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | अधीक्षक | गट-ब (अराजपत्रित) | सरकारी अभियोक्ता, सरकारी अभियोक्ता बृहन्मुंबई यांचे कार्यालय, मुंबई. (तथा कार्यालय प्रमुख ) |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ४ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |
| ६ | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |
| **८. सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर** | | | |
| **अ.क्र.** | **पदे/संवर्ग** | **गट** | **नियुक्ती प्रधिकारी** |
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | स्वीय सहायक | गट-ब (राजपत्रित) | |
| ३ | अधीक्षक/लेखापाल | गट-ब (अराजपत्रित) | सह सचिव, विधि व न्याय विभाग, शाखा नागपूर (तथा विभाग प्रमुख) |
| ४ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ६ | ग्रंथपाल | गट-क | |
| ७ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ८ | लघुटंकलेखक | गट-क | |
| ९ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |
| १० | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |
| **९. सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद** | | | |
| **अ.क्र.** | **पदे/संवर्ग** | **गट** | **नियुक्ती प्रधिकारी** |
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | स्वीय सहायक | गट-ब (राजपत्रित) | |
| ३ | अधीक्षक/लेखापाल | गट-ब (अराजपत्रित) | सह सचिव, विधि व न्याय विभाग, शाखा छत्रपती संभाजीनगर (तथा विभाग प्रमुख) |
| ४ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ६ | सहायक ग्रंथपाल | गट-क | |
| ७ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ८ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |
| ९ | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |

| १०. मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदे/संवर्ग** | **गट** | **नियुक्ती प्रधिकारी** |
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | अधीक्षक/लेखापाल | गट-ब (अराजपत्रित) | मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई. (तथा कार्यालय प्रमुख) |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ४ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ६ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |
| ७ | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |

| ११. मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदे/संवर्ग** | **गट** | **नियुक्ती प्रधिकारी** |
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | अधीक्षक | गट-ब (अराजपत्रित) | सह सचिव, विधि व न्याय विभाग, शाखा नागपूर. (तथा विभाग प्रमुख) |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ४ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ६ | लघुटंकलेखक | गट-क | |
| ७ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |
| ८ | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |

| १२. मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदे/संवर्ग** | **गट** | **नियुक्ती प्रधिकारी** |
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | अधीक्षक | गट-ब (अराजपत्रित) | सह सचिव, विधि व न्याय विभाग, शाखा औरंगाबाद (तथा विभाग प्रमुख) |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ४ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ६ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |
| ७ | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |

| १३. शासकीय अभियोक्ता यांचे कार्यालय, सर्वोच्च न्यायालय, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदे/संवर्ग** | **गट** | **नियुक्ती प्रधिकारी** |
| १ | आस्थापना अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | मा.मंत्री (विधि व न्याय), मंत्रालय, मुंबई |
| २ | अधीक्षक | गट-ब (अराजपत्रित) | शासकीय अभियोक्ता, शासकीय अभियोक्ता यांचे कार्यालय, सर्वोच्च न्यायालय, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली. (तथा कार्यालय प्रमुख) |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ४ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | गट-ब (अराजपत्रित) | |
| ५ | पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक | गट-क | |
| ६ | लिपिक -टंकलेखक | गट-क | |
| ७ | गट-ड कर्मचारी (बाह्ययंत्रणेद्वारे) | गट-ड | |